मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

## टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी स्वतंत्र 5 मतमोजणी टेबल : 1 हजार 530 अधिकारी कर्मचारी नियुक्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या 4 जून रोजी संपन्न होणार आहे. या मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाची द्वितीय सरमिसळ (रँडमायझेशन) निवडणूक निरीक्षक बुदिती राजशेखर, मतमोजणी निरीक्षक मोहम्मद हारूण आणि मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या उपस्थितीत आज संपन्न झाली. यामध्ये मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सुक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक यांचा समावेश होता.



बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये पार पडलेल्या या सरमिसळ प्रक्रियेवेळी मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे समन्वय अधिकारी प्रविण ठाकरे, हिम्मत खराडे, सुनील पांढरे, माहिती व तंत्रज्ञान कक्षाचे समन्वय अधिकारी निळकंठ पोमण, मनुष्यबळ कक्षाचे समन्वय अधिकारी राजू ठाणगे, निवडणूक निरीक्षकांचे समन्वय अधिकारी प्रमोद ओंभासे उपस्थित होते.

तसेच, मतमोजणी निरीक्षकांचे संपर्क अधिकारी सचिन चाटे, निवडणूक निरीक्षकांचे संपर्क अधिकारी आनंद कटके, निवडणूक सहाय्यक अभिजीत जगताप तसेच मावळ व चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले, अर्चना यादव, पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम आदी उपस्थित होते.

मतमोजणीसाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, इतर अधिकारी, सुक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, तालिका कर्मचारी, शिपाई, हमाल, इतर कर्मचारी असे एकूण 1 हजार 530 अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली. मतमोजणी केंद्रातील व्यवस्थेबाबत माहिती देताना सिंगला म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी 4 जून रोजी सकाळी 8 वाजता सुरू होणार आहे.

याकरिता बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टींग हॉलमध्ये मतमोजणीसाठी आवश्यक सर्व तयारी करण्यात आली आहे. याठिकाणी टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी स्वतंत्र 5 मतमोजणी टेबल असणार आहेत. तर पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघनिहाय स्वतंत्रपणे मतमोजणी टेबल लावण्यात आले असून एकूण 113 टेबलवर मतमोजणी केली जाणार आहे.

### विधानसभानिहाय मतमोजणी टेबलची रचना

» पनवेल विधानसभा मतदारसंघासाठी 24 टेबल लावण्यात आले असून मतमोजणीसाठी 23 फेऱ्या होणार आहेत. कर्जत विधानसभा मतदारसंघासाठी 14 मतमोजणी टेबल लावण्यात आले असून मतमोजणीच्या 25 फेऱ्या होतील. उरण विधानसभा मतदारसंघासाठी 14 मतमोजणी टेबल लावण्यात आले असून मतमोजणीसाठी 25 फेऱ्या होणार आहेत. मावळ विधानसभा मतदारसंघासाठी 16 टेबल लावण्यात आले असून 25 मतमोजणी फेऱ्या होणार आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी 24 मतमोजणी टेबल लावण्यात आले असून 23 मतमोजणी फेऱ्या होणार आहेत. तर पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी 16 मतमोजणी टेबल लावण्यात आले असून 25 मतमोजणी फेऱ्या होतील.

# काळेवाडीत 2 कारखान्यांना भीषण आग

## कपड्याच्या कारखान्याला आणि पेपर प्लेट बनवणाऱ्या कारखान्याला भीषण आग : गॅस सिलिंडरचे स्फोट

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील काळेवाडी येथे एका निवासी परिसरातील कारखान्याला सकाळी दहाच्या सुमारास भीषण आग लागली. सिलिंडरच्या स्फोटामुळे नंतर ही आग भडकत जाऊन आसपासचे सहा छोटे कारखाने आगीत भस्मसात झाले आहेत.



सकाळी दहा वाजता दरम्यान काळेवाडी येथील कपड्याच्या कारखान्याला आणि पेपर प्लेट बनवणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागली आहे. ज्या ठिकाणी आग लागली त्या गोडाऊनमध्ये गॅस सिलेंडरचे स्फोट देखील होत आहेत. तसेच आगीच काळ धूर आकाशात सर्वत्र पसरले आहेत. आगीच्या काळ्या धुरामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलं आहे. निवासी जागेत कारखाना आणि गोदाम वापरा साठीशेड बांधली असून शेडपर्यंत जाण्यासाठी अरुंद रस्ता आहे. आग लागल्याचे वेळेत लक्षात आल्याने पुढील मोठी हानी टळली.

पिंपरी चिंचवड महापालिकेचा अग्निशमन दल आग आटोक्यात आणण्यासाठी घटनास्थळी दाखल झालं आहे. ज्या कारखान्याला आग लागली आहे. तो कारखाना अधिकृत कारखाना आहे का? किंवा त्या कारखान्याला पिंपरी चिंचवड महापालिकेने परवानगी दिली होती का असा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.

### एकाच शेडमध्ये दोन व्यवसाय

» बांधण्यात आलेल्या एकाच शेडमध्ये कारखाना आणि गोदाम असे दोन व्यवसाय सुरू होते. कागदी प्लेट बनवण्याचा कारखाना तर कापड आणि गादीचे गोदाम या ठिकाणी होते. त्यामुळे आगीत दोनही व्यवसायांचे मोठे नुकसान झाले आहे.

# रेस्टो बार, पबचे परवाने निलंबित

## गतवर्षी 81 परवाने कायमचे रद्द : जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या आदेशाने कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगरमधील पोर्शे कार अपघातानंतर जाग आलेल्या पालिका, पोलीस, राज्य उत्पादन शुल्क आदी यंत्रणांनी नियमांचे उल्लंघन करणे, अल्पवयीन मुलांना दारू देणे, वेळेचे पालन न करणे आदी कारणांमुळे आतापर्यंत ६३ रूफटॉप, रेस्टो बार आणि पबचा परवाना तात्पुरता निलंबित केला आहे. ही कारवाई पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या आदेशाने केली आहे.



कल्याणीनगरमध्ये झालेल्या दुर्दैवी कार अपघातानंतर प्रशासनाकडून धडक कारवाई करण्यात आली आहे. दारूची दुकाने, बार, पबमध्ये नियमांचे पालन करण्याचे आदेश राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिले होते. मात्र नियमांचे उल्लंघन होत असल्याचे समोर आल्याने विभागाने आक्रमक होत धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत नियमांचे पालन न करणाऱ्या रूफटॉप, रेस्टो बार आणि पबवर कारवाईचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यानंतर कारवाईचा अहवाल जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांना सादर करण्यात आला आहे.

या कारवाईबाबत जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले, गेल्या आर्थिक वर्षात राज्याने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १९ पबवर कारवाई प्रस्तावित केली होती. उत्पादन शुल्क विभागाला त्याबाबतचे आदेश आले होते. तसेच चालू आर्थिक वर्षात ६३ पब मध्ये नियमांचे उल्लंघन केले गेले आहे. त्यानुसार आतापर्यंत ८२ रूफटॉप, रेस्टो बार आणि पबवर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

कल्याणीनगर येथे एका बांधकाम विकासकाचा अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत भीषण अपघात घडविल्यावर नियमांची काटेकोर मलबजावणी सुरू झाली. तथापी, राज्य उत्पादन शुल्क विभागाने वेळोवेळी छापे टाकून मागील आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २९७ परवानाधारकांविरुद्ध लहान मुलांना दारू विक्री करणे, विहित वेळेनंतर परमिट रूम उघडणे, रूफटॉप, पब चालवणे या नियमांनुसार गुन्हे दाखल केले आहेत. अनधिकृत ठिकाणी दारूचे वितरण करणे, दारूचा अवैध साठा ठेवणे आदींचे वारंवार होत असलेले उल्लंघन आणि नियमांची अंमलबजावणी न केल्यामुळे, राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली आहे. गतवर्षी ८१ परवाने कायमचे रद्द केले आहेत. एप्रिल २०२४ मध्ये आतापर्यंत ७० पेक्षा जास्त परवानाधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि ६३ परवाने तात्पुरते रद्द करण्यात आले आहेत.

तसेच रूफटॉप, रेस्टो बार आणि पबवर उत्पादन शुल्क विभागाने गुन्हे दाखल केले आहेत. त्यांच्या सुनावणी दरम्यान संबंधित परवानाधारकावर किती वेळा गुन्हा दाखल झाला आहे, वारंवार खटला दाखल करण्याचे कारण, वेळ देऊनही नियमांची अंमलबजावणी करण्यास नकार देणे, अशाच प्रकारच्या कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळे यांचे थेट परवाने रद्द करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी स्पष्ट केले आहे.

### परवाना कायमचा रद्द होणार

» कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर पुणे पोलीस, जिल्हाधिकारी कार्यालय राज्य आणि उत्पादन शुल्क विभाग सतर्क झाला आहे. त्यानंतर धडक कारवाईचे सत्र सुरू केले आहे. त्यामुळे गेल्या दीड ते दोन वर्षांपासून आतापर्यंत नियमांचे वारंवार उल्लंघन करणारी साडेतीनशेहून अधिक मद्यविक्री केंद्रे, हॉटेल्स, बार, पब, परमिट रूम यांच्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्यावरील दंडात्मक कारवाई वाढवली जाईल किंवा परवाना कायमचा रद्द केला जाणार आहे.

# अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा बुलडोझर

## 15 हजार चौरस फूट बेकायदा बांधकाम पाडले : खराडीत पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

खराडी येथील सर्व्हे क्रमांक ३, पाटील बुवानगर या ठिकाणी पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून अनधिकृत बांधकामावर रविवारी (दि. २) कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये बेकायदा बांधकाम पाडण्यात येऊन १५ हजार चौरस फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले.



महापालिकेकडून शहरातील अनधिकृत बांधकामावर सातत्याने कारवाई करण्यात येते. त्याच कारवाईचा भाग म्हणून खराडीतील पाटील बुवानगर भागात मोठी कारवाई करण्यात आली आहे. कारवाई करण्यात आलेली इमारत अक्षय भोसुरे आणि इतर यांच्या नावे असल्याची माहिती बांधकाम विभागाने 'सीविक मिरर'ला दिली. सोमवारीदेखील (दि. ३) खराडी क्षेत्रामध्ये जॉ कटरची कारवाई करण्यात येणार आहे.

पुढे अशाच प्रकारच्या कारवाया करण्यात येणार आहेत. ही कारवाई अधीक्षक अभियंता श्रीधर येवलेकर, कार्यकारी अभियंता अजित सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता राजेंद्र फुंदे, मंगेश गायकवाड, आरेखक योगेश गुरव, टूलिप इंजिनिअर गिरीश कराळे यांच्या पथकाने जॉ कटर, दोन जेसीबी, तीन ब्रेकर, एक गॅस कटर व दहा बिगारींच्या साहाय्याने ही कारवाई केली. या वेळी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

बांधकाम विभागाकडून अनधिकृत बांधकामावर करण्यात येणारी कारवाई लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे थंडावली होती. तसेच महापालिका कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामे लावण्यात आली होती. त्यामुळे ही कारवाई थंडावली होती. त्यानंतर आता पुन्हा ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. ४ जून रोजी मतमोजणीची कामे झाल्यानंतर पुन्हा महापालिकेकडून ही कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

कल्याणीनगर येथील अपघात प्रकरणानंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाने मुंढवा, घोरपडी, कल्याणीनगर, विमाननगर, कर्वेनगर, कोथरूड, बाणेर भागातील अनधिकृत हॉटेल, पब, बार, रूफ टॉप हॉटेलवर कारवाई केली होती. त्यानंतर आता थेट अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे.

> बांधकाम विभागाकडून शहरातील अनधिकृत बांधकामांना नोटिसा देण्यात येतात. त्यावर बांधकाम विभागाने किती नोटिसांवर कारवाई केली? किती कारवाया बाकी आहेत, याचा आढावा महापालिकेच्या सर्वसाधारण समितीमध्ये घेतला जाणार आहे. त्यातून नोटिसांबाबतची माहिती समोर येईल.
>
> - डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.

# मेट्रोने जा पण, स्थानकापर्यंत चालत या!

## पिंपरी ते निगडी मेट्रो स्थानकांच्या परिसरात 'वाहनतळ' ही संकल्पनाच नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

मेट्रो मार्गाचे पिंपरीपासून निगडीतील शक्ती-शक्ती चौकापर्यंत विस्तारीकरणाचे काम सुरू झाले आहे. मात्र, त्यातील कोणत्याही स्थानक परिसरात वाहनतळाची सुविधा नसेल. कारण, प्रशासनाच्या दृष्टीने मेट्रो स्थानकांच्या परिसरात 'वाहनतळ' ही संकल्पनाच नसल्याने प्रवाशांनी घरापासून स्थानकापर्यंत चालत जायचे किंवा पीएमपी बस अथवा रिक्षाने जायचे. पण, असे होताना सद्यःस्थितीत कार्यान्वित स्थानकांबाबत दिसत नाही. परिणामी, या स्थानकांप्रमाणेच नवीन होणाऱ्या स्थानकांच्या परिसरातील पदपथांवरच बेशिस्तपणे दुचाकी उभ्या करून बिनधास्तपणे आपापल्या कामाच्या ठिकाणी प्रवाशांनी निघून जायचे, अशी स्थिती निर्माण होऊ शकते.

मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी मार्गाचे निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत विस्तारीकरण केले जात आहे. या ४.५१ किलोमीटर मार्गाचे बांधकाम सुरू झाले असून ते अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.



> मेट्रोच्या दोन स्थानकांतील अंतर साधारणपणे पाचशे मीटर आहे. तिथपर्यंत प्रवाशांनी चालत येणे किंवा सार्वजनिक प्रवासी वाहतूक साधणे वापरणे अपेक्षित आहे. मेट्रो मार्गाच्या दोन्ही बाजूस व्यापारी संकुले असून, जमिनीच्या किमती अधिक आहेत. शिवाय, प्रवाशांची वाढती संख्या पाहता, तितक्या वाहनांसाठी वाहनतळ निर्माण करणे अशक्य आहे. त्यावर उपाय म्हणून पीएमपीची फिटर सेवा बळकट करण्यावर भर दिला आहे. मात्र, महापालिकेने जागा उपलब्ध करून दिल्यास संयुक्तपणे वाहनतळ विकसित करण्याचे विचाराधीन आहे. त्यासंदर्भात पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांना पत्र दिले आहे.
>
> - हेमंत सोनवणे, कार्यकारी संचालक, जनसंपर्क, महामेट्रो.

सद्यःस्थितीत पिंपरी ते सिव्हिल कोर्ट स्थानकापर्यंत प्रवासी वाहतूक सुरू आहे. तेथून पुढे रामवाडी व वनाजपर्यंत गाडी बदलून जाता येते. पिंपरी-स्वारगेट मार्गातील सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट भुयारी मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुढे त्याचा विस्तार कात्रजपर्यंत केला जाणार आहे. त्यामुळे निगडीतील भक्ती-शक्तीपासून ते कात्रजपर्यंत थेट प्रवास करता येणार आहे. सद्यःस्थितीत सुरू असलेल्या मार्गात पिंपरी (पीसीएमसी), संत तुकारामनगर (वल्लभनगर), भोसरी (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी असे सहा स्थानके शहरात आहेत. तेथून प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. या स्थानकांना जोडण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाची फिडर बससेवा सुरू केली आहे. तरीही बहुतांश प्रवासी आपल्या दुचाकींनीच मेट्रो स्थानकांपर्यंत येतात. स्थानकांच्या परिसरात जागा मिळेल तिथे दुचाकी उभी करून मेट्रोने पुढील प्रवास करतात. सायंकाळी कामावरून आल्यानंतर आपापल्या दुचाकी घेऊन घरापर्यंत पोहोचत आहेत. मात्र, या दुचाकींसाठी कोणत्याही स्थानकाच्या परिसरात वाहनतळ नसल्याने पदपथावर, रस्त्याच्या कडेला दुचाकी उभ्या केल्या जातात. परिणामी पादचारी रस्त्यांवरून चालतात. रस्त्याच्या कडेला उभ्या दुचाकींमुळे व बेशिस्त रिक्षाचालकांमुळे स्थानकांच्या परिसरात रस्ता अरुंद होऊन कोंडी होते. ती टाळण्यासाठी मेट्रो स्थानकांच्या परिसरात वाहनतळ असणे आणि रिक्षा स्टँडसाठी जागा नेमून देणे आवश्यक आहे.

### विस्तारित मार्गावर चार स्थानके

» पिंपरीपासून निगडीतील भक्तीशक्ती चौकापर्यंत मेट्रोची चार स्थानके प्रस्तावित आहेत. यात चिंचवड स्टेशन, आकुर्डी खंडोबा माळ, निगडी टिळक चौक आणि भक्ती-शक्ती चौक निगडी यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सहा मार्च रोजी या मार्गाचे ऑनलाइन भूमिपूजन झाले होते. आता भक्ती-शक्ती चौक आणि टिळक चौक परिसरात काम सुरू झाले आहे. या विस्तारित मार्गावरील प्रस्तावित स्थानकांच्या परिसरात वाहनतळ न उभारल्यास पदपथांवर व रस्त्याच्या कडेला प्रवासी त्यांच्या दुचाकी उभ्या करतील, रिक्षाचालकही रस्त्यातच उभे राहून प्रवाशांची वाट पाहतील. त्यामुळे या स्थानकांच्या परिसरातही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागेल, हे सर्व टाळण्यासाठी आताच उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# निर्ढावलेपणामुळे हिंजवडीत 'आयटी'ची कोंडी

## जागतिक दर्जाचे आयटी पार्क हिंजवडी प्रशस्त रस्त्यांअभावी वाहतूक कोंडीत सापडले

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे आयटी पार्क हिंजवडी प्रशस्त रस्त्यांअभावी वाहतूक कोंडीत सापडले आहे. याला कारण म्हणजे स्थानिक ग्रामपंचायती, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील समन्वयाचा अभाव, अधिकाऱ्यांचा वेळकाढूपणा व चालढकल वृत्ती. या संस्था गेल्या २५ वर्षांत 'आयटी'ला जोडणाऱ्या रस्त्यांचे भक्कम जाळे निर्माण करू न शकल्यामुळे तेथील कंपन्या आता काढता पाय घेत आहेत.

पायाभूत सुविधा निर्मितीची जबाबदारी असलेल्या शासकीय, निमशासकीय संस्थांनी एकमेकांकडे बोट दाखविण्यात वेळ घालवला आहे. त्यांच्या अधिकाऱ्यांनी कार्यालयात बसून 'एसी'ची हवा खाणे पसंत केल्याने त्यांना समस्या दिसल्या नाहीत. या सर्वांचे पर्यावसन कंपनी स्थलांतरात होत आहे.

आयटीला जोडणाऱ्या अनेक पर्यायी रस्त्यांच्या रेंगाळलेल्या कामांमुळेच वाहतूक समस्या बिकट बनली आहे. आयटी पार्कमध्ये बाहेरून ये-जा करण्यासाठी रामबाण ठरू शकणाऱ्या हिंजवडी-माण-म्हाळुंगे या नवीन सहापदरी रस्त्याचे शेतकऱ्यांशी वाटघाटीबाबत सकारात्मक तोडगा न निघाल्याने काही ठिकाणी काम रखडले आहे.



### कोंडीतून मुक्तीसाठी अडकलेले रस्ते

» हिंजवडी माण-म्हाळुंगे रस्त्याने हिंजवडीतून माण, म्हाळुंगे, बालेवाडीला तसेच पुण्यात जाणे सोपे होणार आहे. फेज एक, दोनमधील वाहतूक बाहेरच्या बाहेर जाण्यास मदत होणार आहे. सूर्या हॉस्पिटल ते हिंजवडी फेज एक हा सुमारे तीन किलोमीटरचा अर्धा रस्ता पिंपरी-चिंचवड महापालिका व अर्धा पीएमआरडीए करणार आहे. मात्र, अनेक वर्षांपासून हे काम 'जैसे-थे' अवस्थेत आहे. हिंजवडीकडील रस्त्याचे दीड वर्षापूर्वी भूमिपूजन झाले. वर्क ऑर्डरही निघाली. मात्र, हा रस्ता पुढे गती घेऊ शकला नाही. वाकडमधील फिनिक्स मॉलपासून वाकड पुलाकडे जाणारा २४ मीटर व ओमेगा पॅराडाईज ते फिनिक्स मॉल १८ मीटर, उत्कर्ष चौक ते सयाजी भुयारी मार्ग (अंडरपास) हे रस्तेही होऊ शकले नाहीत.

### नव्वद टक्के वाहतूक समस्या सुटेल

» हिंजवडीत आयटी पार्क वसविताना केवळ सहा टप्प्यांचे प्लॅनिंग करण्यात आले. मात्र, त्या तुलनेत एमआयडीसीने रस्ते केवळ दोन फेजला पुरेसे होतील एवढेच केले. त्याशिवाय आयटी येण्याआधीच हे सर्व रस्त्यांचे प्लॅनिंग करणे गरजेचे होते. मात्र, तसे न झाल्याने वाकड-हिंजवडी या एकाच रस्त्याने आयटीत प्रवेश करावा लागतो. त्यामुळे कोंडी होते. एमआयडीसी, पीएमआरडीए, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्य तत्सम संस्थांची एकत्र मोट बांधून पर्यायी रस्त्यांचे जाळे विणून वाहतुकीसाठी सर्व रस्ते पूर्ण क्षमतेने खुले केल्यास या रस्त्याने बाहेरच्या बाहेरून ट्रॅफिक जाईल. त्यामुळे आयटीतील ९० टक्के वाहतूक समस्या सुटेल, असे मत अनेक स्थानिकांनी नोंदवले. काही ठिकाणी रस्त्यांची किरकोळ कामे रखडली तर बहुतेक ठिकाणी कामे संथगतीने चालू आहेत.

# इंदापूर तालुक्यात चर्चेला उधाण ताई की वहिनी?

## बारामती लोकसभा निवडणुकीत चुरशीच्या लढतीत कोण बाजी मारणार याची उत्सुकता शिगेला

**पुणे | प्रतिनिधी**

बहुचर्चेत आणि लक्षवेधी ठरलेल्या बारामती लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या सुप्रिया (ताई) सुळे व महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा (वहिनी) पवार यांच्यातील तुल्यबळ चुरशीच्या लढतीत कोण बाजी मारणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मतमोजणीस काही तास उरले असताना निकालावरून सर्वांची धाकधूक वाढली आहे.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या कन्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांना कडवे आव्हान दिले आहे. भाजपने आपली सर्व ताकद सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभी केली असली तरी प्रचारादरम्यान कमालीची चुरस दिसून आल्यामुळे शेवटी विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याची उत्कंठा इंदापूरच्या कट्ट्या-कट्ट्यांवर, दुकानांच्या फळ्यांवर, मित्र परिवार व नातेवाइकांसह कार्यकर्त्यांमध्ये आहे.

बारामती मतदारसंघात सहा विधानसभा क्षेत्रांपैकी चार विधानसभा क्षेत्र महायुतीकडे असताना त्याचा लाभ कितपत सुनेत्रा पवार यांना मिळतो आणि त्या बाजी मारणार का? सुप्रिया सुळे भोर-पुरंदरसह कोणत्या मतदारसंघातून अधिक मताधिक्य घेणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

या लढतीसाठी परस्परविरोधी विजयाचे दावे केले असले तरी त्यात अनेक राजकीय समीकरणे मांडली जात असल्यामुळे कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडणार ही येत्या दोन दिवसात स्पष्ट होणार आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघात एकूण 6 विधानसभांचा समावेश होतो. बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर-हवेली, भोर, आणि खडकवासला हे सहा मतदारसंघ बारामती लोकसभा मतदारसंघात येतात. यामध्ये राष्ट्रवादीचे दोन, अजित पवार आणि दत्तात्रय भरणे, काँग्रेसचे दोन, संजय जगताप आणि संग्राम थोपटे आणि भाजपचे दोन, राहुल कुल आणि भीमराव तापकीर असे आमदार आहेत.



### भरणे-पाटलांची जोडी जनतेने स्वीकारली?

» इंदापूर तालुक्यात माजी मंत्री व भाजप नेते हर्षवर्धन पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दत्तात्रय भरणे यांचे मोठे वर्चस्व आहे. या दोन्ही नेत्यांचे तालुक्यात कार्यकर्त्यांचे मोठे जाळे आहे. या निवडणुकीत दोन्ही नेत्यांनी सुनेत्रा अजित पवार यांच्या पाठीशी आपली ताकद उभी केली. इंदापूर तालुक्यातील जिल्हा परिषद-पंचायत समिती- नगर परिषद व इतर सहकारी संस्थांवर या दोन्ही नेत्यांचे प्राबल्य आहे. लोकसभेचा निकाल जाहीर होताच मतदारांनी पाटील व भरणे या जोडीला एकत्रित स्वीकारले आहे, हे स्पष्ट होणार आहे.

### अजितदादांची धडपड यशस्वी होणार?

» राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अनेक वळणे घेत लढली गेलेल्या या निवडणुकीत पवार विरुद्ध पवार अशी चुरस असली तरी सुरुवातीला भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या विरोधात असलेला मतदारांचा अंतःप्रवाह नंतर शेवटच्या टप्प्यात वळविण्यात अजित पवार यांनी केलेली नियोजनबद्ध धडपड किती यशस्वी होणार, याचीही रंगतदार चर्चा जागोजागी ऐकायला मिळत आहे.

### कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली

» आमदार दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना भरघोस निधी दिला. मागेल त्या गावात मागील तितका निधी त्यांनी उपलब्ध केला. गावगाड्यातील कार्यकर्त्यांना आमदार भरणे यांनी ताकद दिली; परंतु गाव गाड्यात काय दिवे लावले हे निकाल लागल्यानंतर स्पष्ट होणार असल्याने कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली आहे.

# शिरूर तालुक्यात सात गावे अजून तहानलेलीच

## गावांमध्ये 20 टँकरद्वारे 70 खेपा : पावसाळ्याच्या तोंडावर टँकरची मागणी वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील केंदूरसह पाबळ, धामारी, कान्हूर मेसाई, खैरेवाडी, हिवरे, खैरेनगर या सात गावांतील तब्बल २७ हजार ४७३ लोकांची तर ६ हजार ७५४ जनावरांची तहान भागविण्यासाठी दररोज २० टँकरद्वारे ७० खेपा करून पाणीपुरवठा केला जात आहे.

तळेगाव ढमढेरे व मोराची चिंचोली गावांत टँकरची मागणी होत आहे. दरम्यान, टँकर मागणीचे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविले असल्याची माहिती शिरूरचे गट विकास अधिकारी महेश डोके यांनी दिली आहे.

शिरूर तालुक्यातील सात गावांमध्ये शासनाच्या वतीने टँकरने पाणीपुरवठा केला जात असताना टँकर अपुरे पडत आहेत. टँकरच्या खेपा वाढवण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.मात्र, पुढील काही दिवस उन्हाची तीव्रता वाढल्यास व पावसाने ओढ दिल्यास टँकरच्या मागणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या वाढत्या उन्हाच्या तडाख्याने पाणीपातळी खालावली असल्याने अनेक ठिकाणच्या विहीरी व विंधनविहिरी तसेच पाण्याचे स्रोत कोरडे पडू लागले आहेत.

पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न भीषण झाला आहे. टँकर व चारा छावणी सुरू करण्याची मागणी वाढू लागली आहे. जून महिना सुरू झाला असल्याने नागरिकांना पावसाचे वेध लागले असून अपुऱ्या पाण्यामुळे दैनंदिन जीवनातील पाण्याचे गणित विस्कळीत झाले आहे.

मोजके पाणी पिण्यासाठी, जनावरांसाठी व घरकामात वापरासाठी वापरताना महिलांना कसरत करावी लागत आहे. पाण्याअभावी पिके जळून चालली आहे. त्यामुळे शेतकरी देखील पावसाच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसत आहे.



### चारा टंचाईमुळे दूध व्यवसाय अडचणीत

» शिरूर तालुक्यात शेतकरी जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करतात. मात्र, पशुखाद्याच्या वाढलेल्या दरामुळे व दुधाला मिळत असलेल्या कमी भावामुळे पशुपालक शेतकरी अडचणीत आला आहे. आता दुष्काळामुळे चाराटंचाई भासू लागल्याने शेतकऱ्यांना पशुधन जगवायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांचे दूध व्यवसाय अडचणीत आले आहे.

### टँकर मागणीचे प्रस्ताव वरिष्ठांकडे

» शिरूर तालुक्यात सध्या सात गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. चिंचोली मोराची व तळेगाव ढमढेरे गावांचे टँकर मागणी प्रस्ताव प्राप्त झाले असल्याने ते मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयाला पाठवले आहे. लवकरच त्याला मंजुरी मिळेल असे गटविकास अधिकारी महेश डोके यांनी सांगितले.